ePaper
कडेगावमध्ये विषारी वायुगळती; तिघांचा मृत्यू, दहा जण रुग्णालयात

वर्ष - 8 । अंक -135 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- गोलंदाजांपुढे ऑस्ट्रेलियाची भंबेरी!
- पंतची नव्या विक्रमाला गवसणी
- गौतम अदानींच्या अटकेची मागणी
- सांगली: कडेगावमध्ये विषारी वायुगळती

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 23 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मतमोजणी केंद्रापासून 300 मीटर परिसरात जाण्यास मनाई

# मतमोजणी केंद्रावर कडक बंदोबस्त!

## » मुंबईत पोलिसांची सावधगिरी, 300 मीटर परिसरात जाण्यास बंदी

। मुंबई । महाईन्यूज

**मुंबईतील मतदान सुरळीत पार पडल्यानंतर मतमोजणीला गडबड गोंधळ होऊ नये, यासाठी मुंबई पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. शहरातील ३६ मतमोजणी केंद्रावर नियोजनबद्ध सुरक्षाव्यवस्था ठेवण्यात आली असून, मतमोजणी केंद्रापासून ३०० मीटर परिसरात विनाकारण जाण्यास मनाई करण्यात आली आहे.**



विधानसभा निवडणुकीच्या ३६ मतदारसंघांकरिता बोरिवली पूर्वेकडे दोन ठिकाणी, दहिसर, मुलुंड, कांजूर, जोगेश्वरी, कांदिवली, अंधेरी, विक्रोळी, आणि मालाडमध्ये दोन ठिकाणी, सांताक्रूझ, विलेपार्ले, विद्याविहार, कलिना, खार, धारावी, सायन, अँटॉप हिल, दादर, महालक्ष्मी, भायखळा, गिरगाव, मुंबई सेंट्रल आणि फोर्ट या ठिकाणी आज, शनिवारी मतमोजणी होणार आहे. मतमोजणी केंद्राचे बंदोबस्त प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी आणि अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. अटीतटीच्या लढती, संभाव्य विजयी उमेदवार, निकालानंतरची संभाव्य परिस्थिती, मतमोजणी केंद्रावर होणारी गर्दी याचा आढावा पोलिसांच्या वतीने घेण्यात आला असून, त्यानुसार मतमोजणी केंद्रावर बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

पोलिस, निवडणूक अधिकारी, कर्मचारी तसेच परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तिंव्यतिरिक्त इतर कुणालाही मतमोजणी केंद्राच्या ३०० मीटरच्या आतमध्ये जाण्यास किंवा जमाव जमवण्यास, सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्राबरोबरच मुंबई शहरात इतर ठिकाणीदेखील पोलिसांचा बंदोबस्त असेल. विजयी किंवा पराभव झालेल्या उमेदवाराचे निवासस्थान, राजकीय पक्षांची कार्यालये, संवेदनशील भाग या ठिकाणी पोलिसांना तैनात करण्यात आले आहे. कायदा आणि सुवस्था बिघडेल असे कृत्य कोणीही करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### वाहतुकीचेही नियमन

मतमोजणी केंद्राबाहेर राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि त्यांची वाहने यांची गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतमोजणी केंद्र परिसरात वाहतूककोंडी होऊ शकते. संभाव्य परिस्थितीचा आढावा घेत वाहतूक पोलिसांनी काही ठिकाणी वाहनांना बंदी घातली आहे. काही रस्ते एकदिशा मार्ग करण्यात आले आहेत, असे वाहतूक पोलिसांनी सांगितले.

## विजयाचा कॉन्फिडन्स! पुण्यात निकालापूर्वीच फोडले फटाके

कुठे अभिनंदनाचे पोस्टर तर कुठे निकालापूर्वीच फोडले फटाके, नेत्यांचा कॉन्फिडन्स खरा ठरणार ? की ओव्हर कॉन्फिडन्स हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडली असून आता निकालाकडे सर्वांचेच डोळे लागले आहेत. मात्र निकालाला एक दिवस बाकी असतानाच विजयाचा भारीच कॉन्फिडन्स असलेल्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी कुठे आपल्या नेत्यांची विजय रॅली काढली. तर कुठे नवनिर्वाचित आमदार म्हणून अभिनंदनाचे पोस्टर लावल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे या नेत्यांचा हा कॉन्फिडन्स खरा ठरणार का ? की ओव्हर कॉन्फिडन्स हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांनी बाहेर पडत चांगल्या संख्येने मतदान केल्याचं पाहायला मिळालं. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदानाची टक्केवारी चांगली असल्याचं पाहायला मिळालं. पुणे जिल्ह्यातील टक्केवारीचा विचार केल्यास तब्बल 61.5% इतकं मतदान झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे ही वाढलेली टक्केवारी कोणाचा ठोका चुकवणार याबाबत सध्या चर्चा रंगल्याचे पाहायला मिळत आहेत.

## निकालापूर्वीच विजयी जल्लोष, बॅनरबाजी

पुणे शहराचा विचार केल्यास कसबा विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक 58.76% इतकं मतदान झालं आहे. 2019 च्या निवडणुकांमध्ये या ठिकाणी 51 टक्के मतदान झालं होतं. तर शहरात सर्वाधिक कमी मतदान हे शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात झाला आहे. यंदा 50.90 इतकं मतदान शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात झाला आहे. मात्र हे मतदान गेल्या वेळेच्या टक्केवारीच्या तुलनेत जास्त असल्याचं पाहायला मिळत आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात 44% मतदान झालं होतं. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत वाढलेल्या टक्का कोणाच्या पथ्यावर पडणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. मात्र अद्याप तरी सर्वत्र सामने हे अटीतटीचे असल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच शिवाजीनगर, कोथरूड ,पर्वती आणि खडकवासल्यातील उमेदवारांच्या कार्यकर्त्यांना मात्र आपल्या नेत्याचा विजय निश्चित असल्याचं वाटत आहे. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर खडकवासला विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे (NCP) उमेदवार सचिन दोडके यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली. दोडके यांना खांद्यावर घेत फटाके फोडत निकालापूर्वीच विजय जल्लोष करण्यात आला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदार संघाच्या परिसरात आमदारपदी निवड झाल्याबद्दल दोडके यांचे अभिनंदनचे पोस्टर देखील लावले आहेत.

# किंगमेकर अजित पवार असतील!

## निकालाआधीच राष्ट्रवादीच्या नेत्याचा दावा; चर्चांना उधाण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. आता निकालाला अवघे काही तास शिल्लक बाकी आहेत. त्यामुळे या निकालाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे. महाराष्ट्रात नेमकी कोणाचं सरकार येणार? राज्यातील जनता कोणाला कौल देते? कोणता पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरतो?**



पण निकालाच्या आधीच राज्याच्या राजकारणात हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकांचा धडाका सुरु आहे. यातच राजकीय नेत्यांकडून सरकार स्थापनेबाबत दावे प्रतिदावे करण्यात येत आहेत. तसेच मतदानानंतर समोर आलेल्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुती आणि महाविकास आघाडीला सत्तास्थापनेसाठी अपक्षाची मदत लागू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. त्यामुळे राजकीय हालचाली वाढल्या आहेत. यातच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी मोठं विधान केलं आहे. "किंग आणि किंगमेकर सुद्धा अजित पवार असतील", असं अमोल मिटकरी यांनी म्हटलं आहे. ते एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलत होते."राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून एकूण ५६ उमेदवारांनी निवडणूक लढवली. त्यामध्ये दोन ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती आहेत. त्यामध्ये जे आमचे उमेदवार आहेत ते आमचे मेरिटचे उमेदवार आहेत. मी देखील प्रचारासाठी फिरलो आहे. त्यामुळे एकंदरीत लक्षात येतं की ३५ ते ४० जागा आमच्या निवडून येतील. त्यामुळे हा आकडा सत्तास्थापनेसाठी मोठा आकडा असेल. या विश्वासावर मी पक्षाचा प्रचारक किंवा प्रवक्ता म्हणून ट्वीट केलं आहे की, किंग आणि किंगमेकर सुद्धा अजित पवार असतील. अशी माझी कार्यकर्ता म्हणून भावना आहे", असं मोठं विधान अमोल मिटकरी यांनी केलं आहे. "उद्या दुपारपर्यंत मतदानाचं चित्र स्पष्ट होईल. आम्ही महायुतीबरोबर निवडणुका लढवलेल्या आहेत. अजित पवार जी भूमिका घेतील त्या निर्णयाला राष्ट्रवादीचा प्रत्येक कार्यकर्ता बांधील आहे. उद्या एक वाजेपर्यंत सर्व चित्र स्पष्ट होणार आहे. महाराष्ट्रात जे चांगलं सरकार स्थापन होईल त्यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचा सहभाग असेल. संजय शिरसाट यांनी जी भावना व्यक्त केली होती की पक्ष हितासाठी एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो त्यांना मान्य असेल. तशीच माझीही भावना आहे. माझ्या पक्षाचे नेते अजित पवार हे पक्ष हितासाठी जो निर्णय घेतील तो आम्ही मान्य करू", असं सूचक विधान अमोल मिटकरी यांनी केलं. यातच राजकीय नेत्यांकडून सरकार स्थापनेबाबत दावे प्रतिदावे करण्यात येत आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुती आणि महाविकास आघाडीला सत्तास्थापनेसाठी अपक्षाची मदत लागू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. त्यामुळे राजकीय हालचाली वाढल्या आहेत. यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी मोठं विधान केलं आहे.

### 35 ते 40 जागा आमच्या येतील

"किंग आणि किंगमेकर सुद्धा अजित पवार असतील", असं अमोल मिटकरी यांनी म्हटलं आहे. ते एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलत होते."राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून एकूण ५६ उमेदवारांनी निवडणूक लढवली. त्यामध्ये दोन ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती आहेत. त्यामध्ये जे आमचे उमेदवार आहेत ते आमचे मेरिटचे उमेदवार आहेत. मी देखील प्रचारासाठी फिरलो आहे. त्यामुळे एकंदरीत लक्षात येतं की ३५ ते ४० जागा आमच्या निवडून येतील. त्यामुळे हा आकडा सत्तास्थापनेसाठी मोठा आकडा असेल.

# जिल्ह्यातील मतमोजणी कधी पूर्ण होणार ?

## मतदारांचा कौल मिळणार याचे चित्र शनिवारी दुपारपर्यंत स्पष्ट होणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीसाठी शहर-जिल्ह्यासह २१ मतदारसंघात झालेल्या मतदानाची मतमोजणी आज (२३ नोव्हेंबर) मतमोजणी होणार आहे. जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी यांच्यापैकी कोणाला मतदारांचा कौल मिळणार याचे चित्र शनिवारी दुपारपर्यंत स्पष्ट होणार आहे.**

मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे.पुणे, पिंपरी चिंचवड आणि ग्रामीण भागात मिळून एकूण २१ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांमध्ये एकूण ३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. जिल्ह्यात ६१.६२ टक्के मतदान झाले आहे. मतमोजणी करून दुपारपर्यंत निकाल लागण्याच्या दृष्टीने प्रशासनाने मतमोजणीच्या फेऱ्यांचे नियोजन केले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर शहरासह जिल्ह्यात मतदारांची वाढ झाल्याने मतदान केंद्रे वाढवण्यात आली. आठ हजार ४६२ मतदान केंद्रांवर झालेले मतदान आणि टपाली मतदानात झालेली वाढ विचारात घेऊन मतमोजणीसाठी ४६५ फेऱ्या होणार आहेत.मतमोजणीसाठी सुमारे दोन हजार अधिकारी, कर्मचारी



नियुक्त करण्यात आले आहेत. मतमोजणीमध्ये ग्रामीण भागातील दहा मतदारसंघांमधून सर्वाधिक ३० फेऱ्या पुरंदर मतदारसंघासाठी, तर शहरी मतदारसंघांत सर्वाधिक २५ फेऱ्या खडकवासला मतदारसंघात होणार आहेत. सर्वांत कमी १९ फेऱ्या आंबेगाव मतदारसंघासाठी होणार आहेत. उर्वरित मतदसंघांमध्ये २० ते २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार असल्याने दुपारी तीन वाजेर्यंत सर्व फेऱ्या पूर्ण होईल, असा अंदाज जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी व्यक्त केला.शहरातील वडगावशेरी, शिवाजीनगर, हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबा पेठ या आठ मतदारसंघासाठी कोरेगाव पार्क येथील भारतीय खाद्य महामंडळाचे गोदाम येथे, पिंपरी आणि चिंचवड मतदारसंघासाठी बालेवाडी क्रीडा संकूल, तर चिंचवड मतदारसंघासाठी महानगरपालिका कर्मचारी संचलित कामगार स्मृती भवन येथे मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे, तर उर्वरीत नऊ मतदारसंघातील तालुक्याच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

### आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरु

सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार आहे. प्रथम इलेक्ट्रॉनिक ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट (ईटीपीबीएस) आणि टपाली मतपत्रिकांची मोजणी करून त्यानंतर मतदान यंत्रातील मतांची मोजणी होणार आहे. मतदान यंत्रांसाठी ३९१ टेबल,इटीपीबीएस मतपत्रिकांसाठी २८ टेबल असे नियोजन करण्यात आले आहे. मतदान यंत्रातील एका फेरीच्या मतमोजणीसाठी साधारणत: २० ते २५ मिनिटांचा कालावधी लागेल. त्या दृष्टीने दोन हजार ३३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले.मतमोजणीच्या ठिकाणी उमेदवारांकडून नियुक्त प्रतिनिधींना ओळखपत्र देण्यात आले आहे.

# दुपारी 2 वाजेपर्यंत निकाल लागणार

# पिंपरीच्या 20, तर भोसरीच्या 23 फेऱ्या होणार

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती, बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात मतमोजणी

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया उद्या शनिवार (दि.२३) सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी पूर्ण होऊन दुपारी दोन वाजेपर्यंत निकाल समजेल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

बुधवारी (दि.२०) रोजी मतदान झाले आहे. आता निवडणूक विभागाकडून मतमोजणीसाठी मतमोजणी कक्षाची तयारी सुरू झाली आहे. मतमोजणी टेबलांची रचना करण्यात येत आहे. टेबल कर्मचारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक टेवलसाठी तीन मोजणी अधिकारी, एक शिपाई असे चारजणांचे एक पथक आहे. मोजणी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पहिले प्रशिक्षण देण्यात आले आहे. पिंपरीसाठी २० टेबलांवर मतमोजणी होणार असून, त्याच्या २० फेऱ्या होणार आहेत.

तर भोसरीच्या मतमोजणीसाठी २२ टेबलांवर २३ फेऱ्या होतील. टपाली व इलेक्ट्रोल व्होटच्या मोजणीसाठी स्वतंत्र टेबल मांडण्यात येणार आहेत. त्यासाठी स्वतंत्र मोजणी पथकेही नेमण्यात आली आहेत.

### दुपारी बारानंतर निकालाचा कल स्पष्ट होईल

मतमोजणी सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये मतदारांचा कल स्पष्ट होईल. त्यामुळे दुपारी बारानंतर निकालाचा कल स्पष्ट होईल. तसेच दुपारी दोनपर्यंत संपूर्ण निकाल हाती येऊ शकेल असा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



---

# नवी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांची पिंपरी-चिंचवडला भेट

## पिंपरी-चिंचवड घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांना घेतली माहिती



**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे व शहर अभियंता शिरिष आरदवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनांतर्गत मोशी येथे कार्यान्वित असलेल्या विविध प्रकल्पांना भेट दिली. सदर भेटीदरम्यान वेस्ट टू एनर्जी प्रकल्प तसेच हॉटेल वेस्ट टू बायोगॅस व राडारोडा व्यवस्थापन केंद्राच्या तांत्रिक बाबींसह प्रकल्प उभारताना येणाऱ्या आव्हानांबाबत आयुक्त कैलास शिंदे यांनी इत्थंभूत माहिती घेतली.**

पिंपरी चिंचवड शहरात निर्माण होणाऱ्या एकुण घनकचऱ्यावर तसेच बांधकाम राडारोड्यावर मनपा मार्फत करण्यात येणाऱ्या संकलन व प्रक्रिये बाबत संजय कुलकर्णी (मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका) यांनी उपस्थितांना सादरीकरणासह विस्तृत माहिती दिली. आयुक्त कैलास शिंदे यांनी प्रकल्प यशस्वीरित्या उभारुन कार्यान्वित ठेवले बाबत पिंपरी चिंचवड मनपाचे अभिनंदन केले. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरात निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या घनकचऱ्यावर महानगरपालिकेमार्फत करणेत येणाऱ्या शाश्वत व पर्यावरणपुरक प्रक्रिये बाबत संपूर्ण माहिती घेतली, त्यानुसार सदरचे प्रकल्प पर्यावरणपुरक व स्टेट ऑफ दि आर्ट संकल्पनेवर आधारित असून सर्व आव्हानांचा सामना करुन पूर्ण केले असल्याबाबत कौतुक केले.

### यांची प्रामुख्याने उपस्थिती

या पहाणी दौऱ्यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरिष आरदवाड, कार्यकारी अभियंता राजेश पवार, उप अभियंता जितेंद्र रावळ तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे उप अभियंता योगेश आल्हाट उपस्थित होते.



## भूमिका

# टंगळ्या-मंगळ्यांचा महोत्सव

**वसई-विरार ते टिटवाळा किंवा डोंबिवली-बदलापूर ते नेरुळ-खारघर आदी मुंबईच्या टोकापासून (ते जवळच्या सर्व भागांतून) गेल्या १५ वर्षांपासून लोकलचा किमान दीड ते साडेतीन तासांचा प्रवास करीत ‘मुंबई लिटफेस्ट’ साजरा करण्यासाठी येणाऱ्यांसाठी खरेच हा साहित्याचा उत्सव असतो काय?**

म्हणजे गेल्या १५ वर्षांत ‘भगत’ संप्रदायी आंग्लभाषिक लेखकांची सद्दी वाढल्यानंतर, ‘किलो’च्या आकाराने इंग्रजी पुस्तके खरेदी करण्याची प्रदर्शन-पर्यटनबाजी रुळल्यानंतर आणि ‘जयपूर लिटफेस्ट’ची आंतरराष्ट्रीय भावंडे देशभर (केरळ, चंडीगढ, ओदिशा, कोलकाता, नागपूर, पुणे, इ.) विस्तारत गेल्यानंतर मुंबईसारख्या बहुभाषक वाचनसंस्कृती असलेल्या शहरात अशा साहित्यमेळ्याची गरज लक्षात घेण्यासारखी.यंदा या अडीच दिवसीय महोत्सवात १३ देश, १२५ लेखक आणि हजारोंच्या संख्येने वाचणाऱ्यांचा समूह मुंबईच्या एका समुद्रटोकावर म्हणजेच ‘एनसीपीएत’ दाखल झाला. त्याच्या पहिल्याच दिवसापासून या परिसरातले ‘स्टेट्स रेस्टॉरंट’, ‘आरे स्टॉल्स’, एक नंबर गेटपासून एक्स्प्रेस टॉवर्सच्या ९० अंशात असलेल्या चहा-सिगारेट्सच्या टपऱ्या यांच्याजवळ अभूतपूर्व गर्दी जमत होती. कारण फक्त पाच ते दहा मिनिटांचा उशीर झाला तरी




दर्दी वाचक-गृह तुडुंब भरून जाई. मग दोन-तीनशे श्रवणोत्सुकांचा तांडा निराशाशमनाचे मार्ग अरबी समुद्राच्या कठड्यावर किंवा या क्षुधाशांतिभवनांमध्ये शोधू लागे. खरेतर हा दरवर्षीचा शिरस्ता. पण प्रेक्षक- श्रोत्यांप्रमाणेच टंगळ्या-मंगळ्यांची गणना वर्षागणिक वाढत चाललीय. हेही नसे थोडके. पहिल्याच दिवशी प्रेक्षकखेचू चित्रपट दिग्दर्शक सुभाष घई यांची मुलाखत ताज्या दमाचा चित्रकर्ता इम्तियाज अली घेणार, त्यामुळे या दोघांच्यासमवेत सेल्फीच्छुकांनी टाटा थिएटरची विक्रमी आसनक्षमता फोल ठरवली. सभागृह भरून उर्वरित दोन-तीनशेच्या संख्येने रांगेत उभे असलेल्यांना सायंकालीन समुद्री वारे दर्शनासाठी उरले. तिकडे आत घईंचे आत्मचरित्र ‘कर्माज चाइल्ड’ प्रकाशित होताना बॉलीवूडमधील त्यांच्या ३०-४० वर्षांच्या कारकीर्दीची उजळणी झाली. त्यानंतर काफ्का याच्या लेखनाचे अभिवाचन रंगता रंगता दूरवर रेल्वेने पांगणारी गर्दी कमी झाली. दुसऱ्या दिवशी सकाळीच विख्यात लेखक महेश एलकुंचवार यांच्या ‘त्रिबंध’ पुस्तकाच्या ‘द नेक्रोपोलिस ट्रायॉलॉजी’ या अनुवादग्रंथाचे प्रकाशन झाले. अनहिता उबेरॉय यांनी त्यांची मुलाखत घेतली. एलकुंचवारांच्या लिखाणातून थेट सामाजिक भाष्यापेक्षा जे शाश्वत सामाजिक शल्य वाचकाला भिडते, ते या मुलाखतीतून भिडलेच. दोन धर्मीयांतील वैरभाव कुठेतरी दडून असतो आणि प्रसंगी तो उफाळून येतो, असे फाळणीच्या काळात झाले असेल, हे शल्य ओठांवर आल्यानंतर एलकुंचवार म्हणाले- “माणूस म्हणून एकमेकांचा आदर करायला आपण कधी शिकणार, हा प्रश्न मला पडला म्हणून लिखाणाचा घाट घातला, असे काही झालेले नाही. पण हा प्रश्न माझ्या त्या वेळच्या वास्तवाचा एक भाग होता. तो आताही आहे.” ब्रिटिश लेखक पिको अय्यर यांचा सकाळचा गोदरेज थिएटर येथील कार्यक्रम आसनमर्यादेपार गेला. पण तरी कार्यक्रमानंतर वाचकांनी त्यांना ‘सहि’ष्णू ठरवत अर्ध्याहून अधिक तास गुंगवत ठेवले. ‘आजच्या डीजिटल युगात लेखनकला ही अधिकाधिक अवघड बनत चालल्याचे त्यांनी संध्याकाळच्या मुलाखतसत्रात स्पष्ट केले. लेखनदमसासाबद्दल आणि ‘टाइम’ साप्ताहिकातील लेखनाबद्दलच्या आठवणी रंगविल्या. तिसऱ्या दिवशी जयवंत दळवी यांना ‘सलाम’ करणारा कार्यक्रम आणि नव्वदवर्षीय जेन गुडाल यांच्या ‘लेक्चर’ने गर्दी खेचली. ‘जयपूर’ महोत्सवानंतर नावाजल्या जाणाऱ्या या महोत्सवाचे नियोजन उत्तम असले, तरी आसनांच्या मर्यादेची समस्या ‘स्पीकर्स’ अथवा ‘स्क्रीन’द्वारे सोडवण्याची खरी गरज आहे. अन्यथा पुढल्या वर्षी टंगळ्या-मंगळ्यांची संख्या या वर्षाहून अधिक दिसेल, हे भाकीत चुकीचे ठरणार नाही.सभागृह भरून उर्वरित दोन-तीनशेच्या संख्येने रांगेत उभे असलेल्यांना सायंकालीन समुद्री वारे दर्शनासाठी उरले. तिकडे आत घईंचे आत्मचरित्र ‘कर्माज चाइल्ड’ प्रकाशित होताना बॉलीवूडमधील त्यांच्या ३०-४० वर्षांच्या कारकीर्दीची उजळणी झाली.

## प्रासंगिक »

# मातीतला माणूस!


***स्पेनच्या ग्रामीण भागात जन्मलेल्या आणि वाढलेल्या नडालने मातीवरील निष्णात टेनिसपटूपेक्षाही मातीतल्या माणसाची ओळख जिवंत ठेवली.***

‘तू मला माझा खेळ बदलायला लावलास. तुझ्यामुळे मी टेनिसचा आनंद अधिक चांगल्या प्रकारे घ्यायला लागलो...’ टेनिसविश्वातील आजवरच्या वादातीत सर्वाधिक लोकप्रिय टेनिसपटू रॉजर फेडररने, टेनिसकोर्टवर त्याच्यासमोर बऱ्याचदा भारी ठरलेला राफाएल नडाल या त्याच्या प्रमुख प्रतिस्पर्ध्याप्रति काढलेले हे गौरवोद्गार. त्याची गरज बहुधा फेडररला वाटली, कारण हे दोघेही प्रतिस्पर्धी कमी आणि मित्रच अधिक होते. समाजमाध्यमावर प्रसृत गौरवपत्रात फेडररने आणखीही काही लिहिले आहे. २००४ मध्ये ऑस्ट्रेलियन खुली स्पर्धा जिंकल्यानंतर फेडरर जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचला. त्यानंतर दोनच महिन्यांनी मायामीतील एका स्पर्धेत त्याचा सामना स्पेनच्या एका युवा, पीळदार शरीरयष्टीच्या टेनिसपटूशी झाला.

देशातील शिक्षणाची दशा मांडणारे वेगवेगळे अहवाल दर वर्षी प्रसिद्ध होतात आणि त्यात वरच्या इयत्तेत गेलेल्या विद्यार्थ्याला त्याने ‘उत्तीर्ण’ केलेल्या इयत्तेतील बरेच काही अवगत नसते, हे समोर येत राहते. आता हे इतके नेमेचि समोर येते आहे, की विद्यार्थी ज्या इयत्तेत शिकतात, त्यातील अध्ययनाचे आकलन त्यांना झाले, तरच नवल म्हणावे!

# शिक्षणाची दशा मांडणारे वेगवेगळे अहवाल

अध्यापनाची आणि मूल्यमापनाची पुन्हा चर्चा होण्याचे कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी स्वतंत्र केंद्र तयार करण्याचे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात ‘सीबीएसई’चे नियोजन. विद्यार्थ्याला परीक्षेत मिळालेले गुण आणि त्याने अवगत केलेली कौशल्ये यांचा परस्परसंबंध नसल्याचे अनेक अभ्यासांतून समोर येत असल्याने त्यावर ‘सीबीएसई’ने योजलेला हा उपाय आहे. शिक्षकांना विद्यार्थ्याचे केवळ पाठ्यक्रमिक नाही, तर वैयक्तिक कौशल्यवृद्धीचेही मोजमाप करता यावे, याकरिता वेगवेगळ्या पद्धती विकसित करण्यासाठी या केंद्राचा उपयोग होईल, असे ‘सीबीएसई’चे म्हणणे. प्राथमिक चर्चेनुसार, परिणामकारक मूल्यमापनासाठी आवश्यक अशा पद्धती शिक्षकच विकसित करू शकतील, हे याचे वैशिष्ट्य असेल. या उपक्रमांतर्गत ऑनलाइन मंचावर प्रत्येक शिक्षकाला त्याचे-त्याचे पान विकसित करता येईल, ज्याद्वारे तो वेगवेगळ्या विषयांच्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकांच्या स्वरूपासह



विद्यार्थ्याच्या वैयक्तिक कौशल्यवृद्धीचे मूल्यमापन करण्यासाठीच्या पद्धती आणि निकष तयार करू शकेल. या सगळ्याचा पाठपुरावा करत राहण्याचीही सोय असेल. चांगल्या मूल्यमापन पद्धती विकसित करणाऱ्या शिक्षकांना सन्मानित करण्याचे आणि त्याचा आर्थिक लाभ देण्याचेही नियोजन आहे. या मूल्यमापन केंद्राद्वारे तयार केलेली साधने, पद्धती इतर शिक्षण मंडळांच्या शाळांच्या शिक्षकांसाठीही खुली होणार असल्याने एक प्रकारे देशभरातील सर्वच शिक्षकांसाठी मूल्यमापनाची ही नवी खिडकी उघडणार आहे. याच विषयाच्या शृंखलेतील प्रायोगिक जोड म्हणता येईल असा उपक्रम गेल्या आठवड्यांत बातम्यांतून समोर आला, तो म्हणजे केरळमधील कोची शहरातील ‘सीबीएसई’ शाळांनी बालवाडी ते दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली मूल्यमापनाची अनोखी पद्धत. या शाळांनी गुण किंवा श्रेणी देणे बंद करून, इमोजी, हातावर तारे काढून देणे, यश मिळवलेल्यासाठी इतरांनी टाळ्या वाजवणे, सन्मानचिन्ह देणे अशा प्रकारे मुलांचे कौतुक करण्यास सुरुवात केली आहे. किती गुण किंवा श्रेणी मिळणार याची धाकधूक वाढविण्यापेक्षा ज्या प्रतिमा कायम स्मरणात राहतील, अशी दृश्य प्रशंसा करण्यावर भर देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू झाला आहे. अर्थात, त्यासाठी ‘परीक्षा’ घेण्याची वा करण्याची पद्धतही शाळांनी बदलली. धडे पाठ करून उत्तरे लिहिण्यापेक्षा एखादी संकल्पना समजावून सांगून मुलांना त्यावर आधारित प्रश्न प्रत्यक्ष कृतीतून, कार्यानुभवातून सोडवायला सांगितले जाते. उदाहरणार्थ, भाषेवर आधारित संकल्पनेची परीक्षा घेताना, त्यावर आधारित नाटुकलीतून ती मांडून दाखवा, असे सांगितले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।<br>
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।<br>
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आता उडणार निकालाचा बार!

## 2019 च्या तुलनेत जवळपास 4 टक्के अधिक मतदान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यात 2019 च्या तुलनेत जवळपास 4 टक्के अधिक मतदान झाले आहे. 2019 च्या विधानसभेत 61.44 टक्के मतदान झाले तर बुधवारी 65.11 टक्के मतदान झाले आहे. हे मतदान मे महिन्यात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षाही जवळफास 4 टक्क्यांनी जात आहे. लोकसभेत 61.33 टक्के मतदान झाले होते. गेल्या 30 वर्षांच्या इतिहासातील हा सर्वाधिक मत टक्का आहे. यापूर्वी 1995 साली राज्यात 71.7 टक्के मतदान झाले होते. महाराष्ट्र विधानसभेच्या बहुप्रतीक्षेत निवडणुकीसाठीचे मतदान बुधवारी पार पडले. आता सर्वांना प्रतीक्षा आहे, ती शनिवारच्या निकालाची!**



### उत्सुकता शिगेला पोहोचली

कुलाबा या कमी मतदानासाठी कुख्यात मतदारसंघातही यावेळेस मतटक्का 4 टक्क्यांनी वाढला. अर्थात तरीही कुलाब्यातच राज्यात सर्वात कमी मतदान झाले. एकीकडे नक्षलवाद, दुर्गम भाग, विकासापासून कोसो दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मतदार लोकशाही प्रक्रियेवर विश्वास ठेवून 73 टक्क्यांहून अधिक मतदान करतात तर दुसरीकडे राज्याची राजधानी असलेले मुंबईतील मतदार गडचिरोलीपेक्षा 20 टक्के कमी मतदान करतात, राज्यात 288 पैकी किती जागांवर कोण विजयी होईल, याबाबत आता उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.उमेदवार मतदानानंतर आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून, बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांकडून माहिती घेऊन निकालाचे अंदाज बांधण्यात व्यस्त आहेत.

मतदानानंतर काही संमिश्र प्रतिक्रियाही व्यक्त केल्या जात आहेत. राज्याचा मतटक्का वाढल्याबद्दल निवडणूक आयोगाचे अभिनंदनही करायला हवे. विशेषतः मुंबईत वाढलेल्या मतटक्क्यांबद्दल मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांचे अभिनंदन करावे तितके कमीच आहे. मुंबईत अलीकडच्या इतिहासातील सर्वाधिक मतदान झाले. कुलाबा या कमी मतदानासाठी कुख्यात मतदारसंघातही यावेळेस मतटक्का 4 टक्क्यांनी वाढला. अर्थात तरीही कुलाब्यातच राज्यात सर्वात कमी मतदान झाले. एकीकडे नक्षलवाद, दुर्गम भाग, विकासापासून कोसो दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मतदार लोकशाही प्रक्रियेवर विश्वास ठेवून 73 टक्क्यांहून अधिक मतदान करतात तर दुसरीकडे राज्याची राजधानी असलेले मुंबईतील मतदार गडचिरोलीपेक्षा 20 टक्के कमी मतदान करतात, ही बाब चिंतनीय आहे.राज्यात 288 पैकी किती जागांवर कोण विजयी होईल, याबाबत आता उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. राजकीय नेते व उमेदवार मतदानानंतर आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून, बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांकडून माहिती घेऊन निकालाचे अंदाज बांधण्यात व्यस्त आहेत. निकालाच्या सर्व शक्यता गृहित धरून त्यात आपला पक्ष व आपण कुठे असू याबाबत हे नेते व पक्ष रणनीती आखत आहेत. 2019 प्रमाणे नवे राजकीय समीकरणे अस्तित्वात येण्याची शक्यताही चर्चेत आहे. शिवसेना (शिंदे) गटाचे नेते संजय शिरसाठ यांच्या वक्तव्याने तर एकनाथ शिंदे आणि शरद पवार एकत्र येऊ शकतात, अशा चर्चांना आता उधाण आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदानाची वेळ संपल्यावर बुधवारी रात्री रा. स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेतल्याने निकालानंतर फडणवीस दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जातील, अशा चर्चांना ऊत आलेला आहे. दोन दिवस सर्वच पक्ष व नेते 'वेट अँट वॉच'च्या भूमिकेत आहेत.बुधवारी मतदानानंतर प्रमुख संस्थांनी आपले एक्झिट पोल जाहीर केले. यापैकी बहुसंख्य संस्थांनी राज्यात महायुतीचे सरकार येऊ शकते, असा अंदाज वर्तविला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) राज्यात एकाच टप्प्यात मतदान पार पडले. राज्यात एकूण २८८ जागांसाठी सरासरी ६५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालं. आता संपूर्ण राज्याचे लक्ष निकालाकडे लागले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राज्यातील अत्यंत महत्त्वाचा विभाग म्हणजे पश्चिम महाराष्ट्र. एकूण ७० मतदारसंघ असलेल्या पश्चिम महाराष्ट्र विभागात महाविकास आघाडी आणि विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसला चांगलं यश मिळाले आहे. पण गेल्या काही वर्षात राजकीय समीरकरणं बदलल्यामुळे यंदा पश्चिम महाराष्ट्रात नेमकं काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागांपैकी ७० जागा पश्चिम महाराष्ट्रात येतात. जवळपास राज्यातील २५ टक्के जागा या पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर तसेच नगर या सहा जिल्ह्यांतून येतात. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीमुळे येथील समीकरणे बदलली आहेत.मतदानानंतर काही संमिश्र प्रतिक्रियाही व्यक्त केल्या जात आहेत. राज्याचा मतटक्का वाढल्याबद्दल निवडणूक आयोगाचे अभिनंदनही करायला हवे. विशेषतः मुंबईत वाढलेल्या मतटक्क्यांबद्दल मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांचे अभिनंदन करावे तितके कमीच आहे.

---

# सट्टाबाजारामध्ये महायुती 'फेव्हरिट'!

## सट्टाबाजारामध्ये महाआघाडीला 1 रुपयाला 2 रुपये 15 पैसे भाव

। सांगली । प्रतिनिधी ।महाईन्यूज।

**राज्यात विधानसभा निवडणूक नुकतीच संपली असून, सटोडीयांचे लक्ष सट्टा बाजाराकडे लागले आहे. यंदाची विधानसभा निवडणूक अनेक बाबींनी चर्चेत असल्यामुळे सट्टाबाजारातदेखील याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. गुरुवारी (ता. २१) सायंकाळी सट्टाबाजारातील मार्केट दोन तासांसाठी उघडण्यात आले होते. यामध्ये सटोडीयांनी महायुतीला फेव्हरिट दाखवत १४५ ते १५३ जागा मिळवत सत्ता स्थापन होण्याचे संकेत दिले.**

राज्यात २८८ जागांसाठी विधानसभा निवडणूक बुधवारी पार पडली. सत्ता स्थापनेसाठी १४५ आमदारांची गरज भासणार आहे. बुधवारी निवडणूक संपल्यानंतर मुंबई आणि दिल्ली येथील लाइन चालविणाऱ्या शहरातील बुकींनी काही तास मार्केट ओपन केले होते. सर्वसामान्यांपासून उद्योग जगतातदेखील या निवडणुकीच्या निकालाबाबत उत्सुकता आहे. क्रिकेटप्रमाणे निवडणुकीवरदेखील सट्टा राज्यात मोठ्या प्रमाणात लावला जातो. छत्रपती संभाजीनगरातील निवडणुकीच्या सट्टे बाजाराचे बुकिंग सध्या



### ज्याला भाव कमी तो निवडून येण्याची हमी

ज्याला भाव कमी तो निवडून येण्याची हमी असल्यामुळे महायुती सध्या फेव्हरिट मानण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बुकींनी दिलेल्या माहितीनुसार, सट्टाबाजारातील मार्केट हे काही काळ उघडण्यात आले असून, यातून केवळ अंदाज घेण्यात येत आहे. खरा भाव आणि पसंती शुक्रवारी रात्री मार्केट पूर्णपणे एकनाथ शिंदे दुसऱ्या क्रमांकावर मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीसांना पसंती भाजप, काँग्रेस, शिवसेनेला भाव, तर राष्ट्रवादी काँग्रेस दुर्लक्षित सट्टाबाजारातील गणितानुसार, भाजपला ८५ ते ९० जागा मिळण्याची शक्यता आहे. शिवसेना उबाठा गटाला ३५ ते ४० जागा, तर शिंदे गटाला २५ ते ३३ जागा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

स्थानिक पातळीवर नसून, पुण्यावरून चालविण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. गुरुवारी सायंकाळी दोन तास बाजार उघडण्यात आला होता. यामध्ये राज्यात सत्ता स्थापनेसाठी कोण आघाडीवर राहणार? महायुती आणि महाविकास आघाडीला किती जागा मिळणार, यावर भाव देण्यात आला होता. यामध्ये सट्टाबाजारात महायुतीला फेव्हरिट दर्शविण्यात येत होते.महायुती १४५ ते १५३ जागांवर निवडून येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यामध्ये महायुतीला १ रुपयाला ४५ पैसे भाव देण्यात आला .

# गौतम अदानींच्या अटकेची मागणी

## » अमेरिकेत खटले दाखल झाल्यानंतर विरोधक आक्रमक

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सुमारे १२ गिगावॉट सौरउर्जेच्या खरेदीसाठी बिगरभाजप सरकारांमधील अधिकाऱ्यांना सुमारे दोन हजार कोटींच्या लाच दिल्याप्रकरणी अदानी समूह वादात सापडला आहे. समूहाचे प्रमुख गौतम अदानी व इतरांवर अमेरिकेमध्ये गुन्हा दाखल झाल्यावरून गुरुवारी काँग्रेस आणि भाजप या दोन्ही राष्ट्रीय पक्षांमध्ये रणकंदन माजले. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी अदानी यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करत असून अदानी यांना तातडीने अटक केली पाहिजे', अशी मागणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. तर भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा, आयटी विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी या आरोपांचे खंडन करताना काँग्रेसवर हल्लाबोल केला.**



२०२०-२४ या काळात अदानी समूहाने ओदिशा (तत्कालीन सरकार बीजू जनता दल), तामीळनाडू (सरकार-द्रमुक), छत्तीसगढ (तत्कालीन सरकार काँग्रेस), आंध्र प्रदेश ( तत्कालीन सरकार वायएसआर काँग्रेस) आणि जम्मू-काश्मीर (तत्कालीन राष्ट्रपती राजवट) या राज्यांतील सरकारी अधिकाऱ्यांना २६५ दशलक्ष डॉलर म्हणजे सुमारे २ हजार कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप अमेरिकेतील विधि विभागाने केला आहे. आरोपपत्रात नावे असलेल्या सर्व राज्यांमध्ये भाजपेतर पक्षांची सरकारे होती. 'विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये लाचखोरी झाली असेल तरीही त्याची चौकशी केली पाहिजे. मात्र या प्रकरणी चौकशीची सुरुवात अदानी यांना अटक केल्यानंतरच होऊ शकते', असे राहुल गांधी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत म्हटले. चार दिवसांनंतर, सोमवारी संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार असून सभागृहांमध्ये हा मुद्दा उपस्थित केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अदानी समूहाने भारतीय नव्हे तर अमेरिकेतील कायद्यांचेही उल्लंघन केले आहे. या समूहाभोवतीचे सर्व हितसंबंध काँग्रेस उघडकीस आणेल, असा दावाही राहुल गांधींनी केला. राहुल गांधींनी थेट मोदींना लक्ष्य केल्यामुळे भाजपने तीव्र प्रतिवाद करत विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांकडे अंगुलीनिर्देश केला. भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा यांनी राहुल गांधींच्या दाव्यांची खिल्ली उडवली. २०१९ मध्ये राफेल खरेदी व्यवहारामध्ये लाचखोरी झाल्याचा आरोप केला होता. करोना काळातही पत्रकार परिषदांमधून मोठमोठे दावे केले गेले. पण, नंतर न्यायालयात राहुल गांधींना माफी मागावी लागली होती, असे पात्रा म्हणाले. तर अमित मालविय यांनी या आरोपांच्या वेळेबाबत प्रश्न उपस्थित केला. संसदेचे अधिवेशन तोंडावर आले असताना आणि अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प लवकरच अध्यक्ष होणार असताना आताच हे आरोप का केले जात आहेत, असे ते म्हणाले. काँग्रेस ही जॉर्ज सोरोस यांची हस्तक असल्याप्रमाणे वागत असल्याचा आरोपही मालवीय यांनी केला. अदानी समूहाचे आर्थिक घोटाळे बाहेर येत असताना गौतम अदानींना अजूनही अटक केली जात नाही, कारण मोदी अदानींचा बचाव करत आहेत. हिंडेनबर्ग प्रकरणी 'सेबी'च्या प्रमुख माधबी पुरी-बुच यांनी निष्पक्ष चौकशी केली नाहीच, उलट त्याच अदानींच्या संरक्षक झाल्या आहेत. त्याबाबतची वस्तुस्थिती काँग्रेसने लोकांसमोर आणली आहे.अमेरिकेची बाजार नियामक 'एसईसी'ने स्वतंत्रपणे, गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी आणि अझूर पॉवरच्या अधिकाऱ्यांवर न्यूयॉर्क जिल्हा न्यायालयात खटला दाखल केला आहे. त्यांच्यासह, इतर पाच जणांवर अमेरिकेच्या लाचलुचपत प्रतिबंधक कायदा अर्थात 'फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट (एफसीपीए)'च्या उल्लंघनाचा आणि कट रचल्याचा आरोप आहे

### हिंडेनबर्गनंतर दुसरा आरोप

शेअर बाजारातील गैरव्यवहारासंदर्भात अमेरिकेतील रिसर्च कंपनी 'हिंडेनबर्ग'ने दोन वेगवेगळे अहवाल प्रसिद्ध केल्यानंतर देशभर गदारोळ माजला होता. त्यावेळीही काँग्रेससह विरोधी पक्षांनी या आर्थिक गैरव्यवहारांची संयुक्त संसदीय समितीद्वारे (जेपीसी) चौकशी करण्याची मागणी केली होती. अदानी समूहाविरोधातील नव्या आरोपानंतर गुरुवारी पुन्हा काँग्रेस व विरोधी पक्षांनी 'जेपीसी' स्थापन करण्याची मागणी केली. केवळ अदानी समूहच नव्हे, तर 'सेबी'सह अन्य संस्थांच्या कारभाराचीही जेपीसीमार्फत चौकशी केली पाहिजे, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी म्हटले आहे. तर अदानींवर नव्याने झालेल्या आरोपांबाबत मोदी यांनी स्पष्टीकरण दिले पाहिजे, अशी मागणी तृणमूल काँग्रेसने केली आहे. माकपनेही अदानींची सीबीआयमार्फत चौकशी केली पाहिजे.

# सांगली: कडेगावमध्ये विषारी वायुगळती

## » प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारीही घटनास्थळी पोहचले

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कडेगाव तालुक्यातील शाळगाव-बोंबाळेवाडी औद्योगिक वसाहतीतील एका रसायन कारखान्यात विषारी वायूची गळती झाल्याने दोन महिलांसह तिघांचा मृत्यू झाला. या गळतीमुळे याशिवाय अन्य दहा जण बाधित झाले असून यातील तीन रुग्ण अत्यवस्थ आहेत. या गळतीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.**

सुरुवातीस खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरातील नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले. नंतर परिणाम ओसरल्यावर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली.औद्योगिक वसाहतीमध्ये म्यानमार रसायन कारखाना असून, या ठिकाणी गुरुवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास विषारी वायूची गळती झाली. त्यामध्ये राणी राजेंद्र उथळे (वय ४०, रा. येतगाव) या महिलेचे उपचार सुरू असताना रात्री, तर नीलम रेठरेकर (वय ४५, रा. वांगरेठरे मसूर) आणि किशोर चापकर (वय ४५, रा. बोंबाळेवाडी) या दोघांचा उपचार सुरू असताना शुक्रवारी मृत्यू झाला.विषारी वायूची बाधा



झालेल्या माधुरी पुजारी (वय ४०), सायली पुजारी (वय २२), मारुती थोरात (सर्वजण रा. बोंबाळेवाडी), प्राजक्ता पोपट मुळीक, वरद पोपट मुळीक, शिवानी राहुल मुळीक, शुभम अर्जुन यादव (सर्व रा. शाळगाव) यांच्यावर कराडमधील सह्याद्री, श्री हॉस्पिटलसह अन्य खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. तर रायगाव, शाळगाव व बोंबाळवाडी या परिसरातील १० जणांवरही स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले.विषारी वायुगळतीने परिसरातील डोंबा वस्ती, बारूखोल परिसरासह शाळगाव, बोंबाळेवाडी, रायगाव परिसरात भीतीचे वातावरण पसरले. उपाय म्हणून या परिसरातील नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले. नंतर परिणाम ओसरल्यावर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली.

### नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले

उपाय म्हणून या परिसरातील नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले. घटना घडल्यानंतर माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच तहसीलदार अजित शेलार, पोलीस निरीक्षक संग्राम शेवाळे यांच्यासह प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारीही घटनास्थळी पोहचले. अग्निशामक यंत्रणा, वैद्यकीय पथकही परिसरात ठाण मांडून आहे. वायुगळतीच्या सखोल चौकशीची मागणी करण्यात येत असून, या परिसरात रहिवासी मुखपट्टीचा वापर करून दैनंदिन काम करत आहेत.

# श्वेता बच्चनला आवडायचा ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड

अभिनेत्री ऐश्वर्या राय व तिचा पती अभिषेक बच्चन वेगळे राहत आहेत, असं म्हटलं जात आहे. ऐश्वर्या लेक आराध्याला घेऊन आई वृंदा रॉय यांच्याबरोबर राहतेय तर अभिषेक आई-वडिलांबरोबर राहत आहे. काही महिन्यांपूर्वीच ऐश्वर्याने सासर सोडलं, अशा चर्चा आहेत. दोघांच्या नात्याबद्दल सुरू असलेल्या या चर्चा अफवा आहेत की सत्य याबाबत ते दोघे किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही काहीच प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र ऐश्वर्या व तिची नणंद श्वेता बच्चन यांच्यात वाद असल्याच्या बातम्या येत राहतात. अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नात अभिषेक बच्चन त्याचे वडील अमिताभ बच्चन, आई जया बच्चन, बहीण श्वेता, तिचे पती निखिल नंदा, त्यांची मुलं अगस्त्य नंदा व नव्या नवेली नंदा यांच्याबरोबर आला होता. तर ऐश्वर्या मात्र लेक आराध्याला घेऊन नंतर या लग्नाला आलेली. तेव्हाही ऐश्वर्या व अभिषेक यांच्या नात्याची खूप चर्चा झाली. त्यांनी ग्रे डिव्हॉर्स घेतला आहे, असं म्हटलं जातंय. ऐश्वर्या व श्वेता बच्चन यांचं एकमेकींशी बिनसलं आहे, अशीही चर्चा आहे. पण एकेकाळी श्वेताला ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड खूप आवडायचा.श्वेता बच्चन हिने स्वतःच याबाबत खुलासा केला होता. अमिताभ बच्चन यांची लेक श्वेता सिनेइंडस्ट्रीत आली नाही, ती अभिनयापासून दूर राहिली पण बॉलीवूडमध्ये तिचे अनेक मित्र आहेत. ती तिच्या आई-वडिलांबरोबर चित्रपटाच्या सेटवर जायची जिथे अनेक स्टार्स तिचे मित्र झाले. श्वेताला एक बॉलीवूड अभिनेता खूप आवडायचा. तो तिचा क्रश होता व तो तिच्या वहिनीचा म्हणजेच ऐश्वर्याचा एक्स बॉयफ्रेंड आहे. सलमान खान श्वेताचा क्रश होता आणि तिनेच एकदा याचा खुलासा केला होता.श्वेता बच्चन एकदा करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' शोमध्ये गेली होती. या शोमध्ये तिने सलमान खानवर क्रश असल्याचं सांगितलं होतं.

# आलियाकडे 557 कोटींची संपत्ती!

आलिया भट्ट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. तिच्या नवीन चित्रपटाबद्दल नाही तर एका विधानाबद्दल. खरं तर, व्होग मॅगझिनशी झालेल्या संभाषणात आलियाने सहज सांगितले होते की तिचा पती रणबीर कपूर तिला अनेकदा लिपस्टिक पुसण्यास सांगतो. त्याला बायकोची लिपस्टिक आवडत नाही. दहा मिनिटांची क्लिप व्हायरल व्हायला वेळ लागला नाही. रणबीर सोशल मीडियावर ट्रोल होऊ लागला. आलियाची एकूण तीन घरे आहेत. लंडनमध्ये एक आणि मुंबईतील जुहू आणि वांद्र्यात प्रत्येकी एक. आलियाची बहीण शाहीन जुहूच्या घरात राहते. तिने पहिले घर भारतात नाही तर लंडनमध्ये घेतले. एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत तिने सांगितले की, 'लंडनमध्ये घर घेण्याचे माझे स्वप्न होते. 2018 मध्ये मी माझे स्वप्न पूर्ण केले याचा मला आनंद आहे. लंडनचा पॉश एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोव्हेंट गार्डनमधील आलियाच्या घराची किंमत 25 कोटी रुपये आहे. कोरोनाच्या काळात 2020 मध्ये आलियाने मुंबईतील वांद्रे येथे एक मोठे घर घेतले. वास्तू पाली हिल्स कॉम्प्लेक्सच्या पाचव्या मजल्यावरील अंदाजे 2500 स्क्वेअर फूटच्या या अपार्टमेंटची किंमत अंदाजे 40 कोटी रुपये आहे. आलियाच्या या नवीन अपार्टमेंटमध्ये सातव्या मजल्यावर रणवीर कपूरचेही घर आहे. शाहरुख खानची पत्नी गौरी खानने आलिया आणि रणवीरच्या घराचेही इंटिरियर डिझाइन केले आहे. अनोखे फर्निचर आणि सुंदर कोटांनी सजलेल्या या घरात शाहीन भट्ट देखील आलियासोबत राहते. तिच्या तीन मांजरीही येथे राहतात. आलिया अनेकदा इंस्टाग्रामवर युरोपियन स्टाईल इंटीरियर आणि आरामदायी सोफ्यांसह लाइव्ह करते. 2.5 कोटी रुपयांच्या आलिशान रेंज रोव्हर वोगपासून ते BMW 7 सिरीजपर्यंत, आलिया भट्टकडे करोडोच्या गाड्यांचा संग्रह आहे. त्याच्याकडे 3 ऑडी आहेत, त्यापैकी दोन SUV आणि एक सेडान AUDI A6 आहे. आलियासोबत रणवीर कपूरच्या कार कलेक्शनचा समावेश केला तर तिच्याकडे जवळपास डझनभर गाड्या आहेत. ही कार 0-7 सेकंदात 0-100 किमी प्रतितास वेग देखील मिळवू शकते. ही कार ६० लाखांची असली तरी ती आलियाची फेव्हरेट आहे. याशिवाय तिच्याकडे काळ्या रंगाची BMW 7-SERIES (730D VARIANT) लक्झरी कारची आहे. या किंमत 1.38 कोटी रुपये आहे. ही 7 सीरीज बीएमडब्ल्यू 250 किमी प्रतितास वेगाने धावू शकते. ते फक्त 6.2 सेकंदात 100 किमी प्रतितास वेग वाढवते.



# जिनिलीयाला दिल्या हटके शुभेच्छा

आपल्या सहज – सुंदर अभिनयाने सर्वांना भुरळ घालणाऱ्या जिनिलीया देशमुखचा आज ३७ वाढदिवस. २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तुझे मेरी कसम' या चित्रपटातून जिनिलीयाने हिंदी मनोरंजन विश्वात पदार्पण केलं होतं. तिने या चित्रपटात पहिल्यांदाच रितेशबरोबर स्क्रीन शेअर केली होती. 'तुझे मेरी कसम' चित्रपटाच्या सेटवर दोघांमध्ये मैत्री झाली अन् पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात होऊन रितेश – जिनिलीयाने लग्नगाठ बांधली.एकमेकांना जवळपास १० वर्षे डेट केल्यावर जिनिलीया – रितेश २०१२ मध्ये विवाहबंधनात अडकले. या दोघांकडे मराठीसह बॉलीवूडमधली आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. रितेश-जिनिलीयाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. आज पत्नीच्या वाढदिवसानिमित्त रितेश देशमुखने खास पोस्ट शेअर करत बायकोला शुभेच्छा दिल्या आहेत.रितेशने यंदा जिनिलीयाच्या वाढदिवसानिमित्त मजेशीर व्हिडीओ शेअर केला आहे. लग्नाच्या आधी नवऱ्याचं प्रेम अन् लग्नानंतरचं प्रेम अशा दोन भागांमध्ये अभिनेत्याने हा व्हिडीओ शेअर केला आहे. सुरुवातीला लग्नाआधीच्या प्रेमात "तुम सा कोई प्यारा, कोई मासूम नहीं है" हे गाणं बॅकग्राउंडला वाजतं. तर, लग्नानंतर "तुमने मेरी जिंदगी खराब की है" हे गाणं लागतं. यात रितेश जिनिलीयाची सेवा करत असल्याचं पाहायला मिळतंय. हा मजेशीर व्हिडीओ रितेश – जिनिलीयाच्या चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. रितेशने हा मजेशीर व्हिडीओ शेअर केला असला तरी याला अभिनेत्याने रोमँटिक कॅप्शन दिलं आहे. "HAPPY BIRTHDAY बायको...



# माझा नवरा बोरींग



राणी मुखर्जीने नुकतेच पती आदित्य चोप्रासोबतच्या बाँडिंग आणि रिलेशनशिपबद्दल सांगितले. ती म्हणाली की, आदित्य एक बोरींग व्यक्ती आहे, परंतु ती त्याच्या आयुष्यात स्पार्क आणते. राणीने कबूल केले की, तिने प्रसिद्धीपासून दूर राहून तिचे आयुष्य खाजगी ठेवणे पसंत केले. तिचे आणि आदित्य चोप्राचे नाते कसे अधिक सुंदर झाले हे अभिनेत्रीने सांगितले. अभिनेत्रीने तिच्या यशस्वी वैवाहिक जीवनाबद्दल खुलेपणाने माहिती दिली. फिल्म कम्पेनियनला दिलेल्या मुलाखतीत राणी म्हणाली- 'आदित्य आणि माझ्यासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे जेव्हा आम्ही एकत्र चित्रपट पाहायला जातो. आम्ही मुंबईतील YRF स्टुडिओमध्ये दर शुक्रवारी चित्रपट पाहतो. 'रांगेत जाऊन उभे राहणे, तिकीट काढणे आणि पॉपकॉर्न घेमे ही खूप मजा असते. आजकाल तुम्हाला पिझ्झा पण मिळतो, मला एकत्र जेवायला आणि चित्रपट बघायला आवडते. 'जेव्हा आम्ही भारताबाहेर असतो तेव्हा आम्ही एकमेकांसोबत वेळ घालवतो. त्याचा हात धरणे असे त्याच्याबरोबर सर्वकाही चांगले वाटते. नात्यात मी आणि आदित्य दोघेही एकमेकांचा आदर करतो.

# साराभाईच्या टीमचे गेट टुगेदर

अभिनेत्री रुपाली गांगुली नुकतीच टीव्ही मालिका साराभाई VS साराभाईच्या टीमसोबत डिनरसाठी गेली होती. रुपालीने या डिनर डेटशी संबंधित व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केला आहे. यावेळी रत्ना पाठक शहा, सतीश शाह आणि राजेश कुमार हे देखील उपस्थित होते. व्हिडिओच्या सुरुवातीला रुपाली एका रेस्टरॉमध्ये शिरताना दिसत आहे. रुपाली रेस्टरॉमध्ये सतीश आणि राजेशला भेटली. यानंतर शोच्या टीमने एकत्र फोटो क्लिक केले. व्हिडिओमध्ये टीम एकत्र जेवण करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना रुपालीने लिहिले - काही लोक असे मित्र बनतात की आयुष्यभर त्यांच्यासोबत राहतात. या व्हिडिओवर शोचे चाहते टीमला एकत्र पाहून कमेंट सेक्शनमध्ये आनंद व्यक्त करत आहेत.

# पंतची नव्या विक्रमाला गवसणी!

## विराटनंतर कसोटीत ‘ही’ कामगिरी करणारा तिसरा फलंदाज

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील आजपासून सुरू झालेल्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया मालिकेच्या पहिल्या दिवशी भारतीय संघाची फलंदाजी काही खास नव्हती. टीम इंडिया अवघ्या १५० धावा करून सर्वबाद झाली. भारताची टॉप ऑर्डर धावा करण्यात अयशस्वी ठरली. संघासाठी सर्वात मोठी धावसंख्या पदार्पणवीर नितीश कुमार रेड्डीनेकेली. त्याने ५३ चेंडूत ४१ धावा करत संघाचा डाव उचलून धरला. यानंतर दुसरी सर्वोच्च धावसंख्या ३१ धावांची होती, जी ऋषभ पंतने केली. या ३१ धावांमुळे पंतने आणखी एक पराक्रम केला. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या एका खास यादीत ऋषभ पंत दाखल झाला आहे.**



जागतिक कसोटी चॅम्पियनशिप अंतर्गत खेळवली जात आहे. भारतीय संघ सध्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर असला तरी अंतिम फेरीत जाण्याची शक्यता नक्कीच आहे. दरम्यान, आतापर्यंत फक्त तीन भारतीय फलंदाजांना WTC म्हणजेच जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये २ हजारपेक्षा जास्त धावा करता आल्या आहेत. रोहित शर्मा आणि विराट कोहलीनंतर आता ऋषभ पंतच्या नावाचाही यात समावेश झाला आहे. ऋषभ पंत रस्ते अपघातामुळे जवळपास दोन वर्षे क्रिकेटपासून दूर होता. पण आता पुनरागमन केल्यानंतर त्याने अप्रतिम कामगिरी करत हा टप्पा गाठला.आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज रोहित शर्मा आहे. ज्याने आतापर्यंत ३७ सामन्यांत २६८५ धावा केल्या आहेत. यानंतर विराट कोहली आहे, त्याने आतापर्यंत ४२ सामने खेळले असून डब्ल्यूटीसीमध्ये त्याने २४३२ धावा केल्या आहेत. तर ऋषभ पंतने ३० सामने खेळत २०२७ धावा केल्या आहेत. २ हजार धावांचा टप्पा गाठणारे हे ३ फलंदाज आहेत. या यादीत चौथ्या क्रमांकावर शुबमन गिल आहे, ज्याने २९ सामन्यांमध्ये १८०० धावा केल्या आहेत.वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे जो रूट. जो इतर फलंदाजांपेक्षा खूप पुढे आहे. त्याने आतापर्यंत ६१ सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी करत ५३२५ धावा केल्या आहेत. दुसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजाच्या नावावर चार हजार धावाही नाहीत. मार्नस लबुशेन दुसऱ्या स्थानावर आहे, ज्याने ४६ सामन्यांत ३९०४ धावा केल्या आहेत.भारतीय संघ पर्थ कसोटीच्या पहिल्याच डावात पहिल्या दिवशी १५० धावांवर सर्वबाद झाला. भारताला पहिल्या दिवशी सर्वबाद केल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ खूपच आनंदात दिसत होता. पण दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाचा हा आनंद फार कमी काळ टिकला नाही. जसप्रीत बुमराहने सुरुवातीच्या षटकांमध्येच तीन मोठे विकेट घेत ऑस्ट्रेलियाला धक्के दिले. या सततच्या गमावलेल्या विकेट्समुळे ऑस्ट्रेलिया संघाच्या धावांनाही चांगलाच ब्रेक लागला. बुमराहच्या या तीन विकेट्समध्ये ऑस्ट्रेलियाचा सर्वात अनुभवी आणि दिग्गज कसोटी क्रिकेटपटू स्टीव स्मिथ याला गोल्डन डकवर बाद केलं. बुमराहने स्टीव्ह स्मिथची विकेट घेताच ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भारतीय संघ फलंदाजी करत असताना या खेळपट्टीवर फलंदाजी करणे नक्कीच अवघड होतं, पण याचं प्रात्यक्षिक ऑस्ट्रेलियालाच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजांनी दिलं. भारतीय वेगवान गोलंदाजांच्या भेदक गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाच्या टॉप ऑर्डरने गुडघे टेकले.भारताने दिलेल्या १५० धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या डावाची सुरुवात खूपच खराब झाली. आपला पहिलाच कसोटी सामना खेळत असलेला नॅथन मॅकस्विनीला बुमराहच्या तिसऱ्या षटकात पायचीत झाला. मैदानावरील पंचांनी बाद न दिल्याने कर्णधार बुमराहने चांगला रिव्ह्यू घेत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. जसप्रीत बुमराहने सातव्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर उस्मान ख्वाजाला झेलबाद केले. राउंड द विकेट गोलंदाजी केली आणि गुड लेंग्थवर टाकलेल्या चेंडूने बॅटची कड घेत स्लिपमध्ये उभ्या असलेल्या विराट कोहलीच्या हातात गेला. विराटने स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना लबुशेनचा झेल सोडला होता पण नंतर बुमराहच्या गोलंदाजीवरच त्याने हा झेल टिपत संघाला मोठे यश मिळवून दिले.

### बुमराहचा पर्थ कसोटीत दुर्मिळ विक्रम

बुमराहच्या गोलंदाजीवर ऑस्ट्रेलियाचे दोन्ही सलामीवीर स्वस्तात बाद झाले होते. या धक्क्यातून ऑस्ट्रेलिया सावरत नाही तोवर बुमराहने कांगारू संघाला सर्वात मोठा धक्का दिला. ख्वाजा बाद झाल्यानंतर फलंदाजीसाठी आलेला दिग्गज फलंदाज स्टीव्ह स्मिथ गोल्डन डकवर बाद होत तंबूत परतला. ही विकेट घेत बुमराहने एक नवा पराक्रम केला आहे. स्टीव्ह स्मिथला कसोटी क्रिकेटमध्ये गोल्डन डकवर बाद करणारा जसप्रीत बुमराह जगातील दुसरा तर भारताचा पहिला गोलंदाज ठरला आहे. जसप्रीत बुमराहच्या आधी दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज वेगवान गोलंदाज डेल स्टेन ही कामगिरी केली होती.

# भारतीय गोलंदाजांपुढे ऑस्ट्रेलियाची भंबेरी!

## 44 वर्षांत कांगारू संघावर दुसऱ्यांदा ओढवली ‘ही’ नामुष्की

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया संघातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला पर्थ येथील सामन्यान सुरुवात झाली आहे. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणारा भारतीय संघ ऑस्ट्रेलियन वेगवान माऱ्यापुढे १५० धावांवर गारद झाला. यानंतर भारतीय गोलंदाजांनी जशात तसे उत्तर दिले, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या दिवसांचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात सात गडी गमावून ६७ धावा करु शकला.**



यासह कांगारु संघाच्या नावावर एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.पर्थ कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा ॲलेक्स कॅरी (१९) आणि मिचेल स्टार्क (६) धावांवर परतले. ऑस्ट्रेलियन संघ भारताच्या तुलनेत अजून अजूनही ८३ धावांनी मागे आहे. आतापर्यंत एकाही कांगारू फलंदाजाला २० च्या वर जाता आलेले नाही. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार विकेट् घेतल्या आहेत.

त्याचबरोबर मोहम्मद सिराजने २ आणि पदार्पणवीर हर्षित राणाने एक विकेट घेतली.जर आकडेवारीबद्दल बोलायचे तर, १९८० नंतर ऑस्ट्रेलियन संघासोबत असे घडण्याची ही दुसरी वेळ आहे, जेव्हा ऑस्ट्रेलियाने मायदेशात कसोटी खेळताना ४० धावांचा आकडा गाठण्यापूर्वी ५ विकेट्स गमावल्या आहेत.

यापूर्वी २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेनेही अशीच कामगिरी केली होती.

त्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर पूर्णपणे शरणागती पत्करली होती. त्यावेळी होबार्टमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने केवळ १७ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या.

### ऑस्ट्रेलियाने 5 विकेट्स गमावल्या

टीम इंडियाच्या गोलंदाजी सुरूवात होताच, जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलियाच्या टॉप ऑर्डरला खिंडार पाडली. त्याने पहिल्या तीन विकेट्स घेत ऑस्ट्रेलियाच्या डावाला मोठा धक्का दिला. त्यात स्टीव्ह स्मिथला गोल्डन डकवर पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याचाही समावेश होता. मोहम्मद सिराजला दुसऱ्या टोकाकडून चांगली गोलंदाजी करता आली नाही, त्यामुळे कर्णधाराने हर्षित राणाकडे गोलंदाजी सोपवली.